भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

८

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

महानगरपालिका मुख्यालय, काप-आळी, जुनी एस.टी.स्टँड, भिवंडी, जि. ठाणे. पिन कोड-४२१३०२

## जाहीर सूचना

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खालील संवर्गात करारपध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात ठोक वेतनावर सहा महिने कालावधीकरीता भरावयाची असून त्याकरीता पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज, स्वपरिचय पत्र व शैक्षणिक अर्हतेविषयक कागदपत्राच्या प्रतींसह फक्त नोंदणीकृत टपालानेच दि.१२/०२/२०२१ रोजी ठिक सायं. ०५.४५ वाजेपर्यंत भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय नवीन प्रशासकिय इमारत, काप-आळी, जुनी एस.टी.स्टँड, भिवंडी, जि. ठाणे. या पत्यावर पाठवावेत. मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच या कार्यालयात थेट अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी. मा.स्थायी समितीच्या मान्यतेने या ६ महिने कालावधीत वाढ/घट होऊ शकेल मात्र हे पद तात्पुरत्या स्वरुपाचे राहतील व त्या पदावर सेवेत कायम केले जाणार नाही. कायमस्वरुपी नेमणुक करावयाची असल्यास त्याबाबत स्वतंत्र जाहिरात दिली जाईल व त्याकरिता स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.

**ठोक वेतनावर पदे भरणेबाबतच्या पदांचा तपशील**

| अ.क्र | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक पात्रता व अर्हता | वयोमर्यादा वर्षे | एकत्रित मासिक मानधन रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | ५ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी व शासकिय/निमशासकिय/नामांकित बांधकाम संस्थेतील ३ वर्षे स्थापत्य कामाचा अनुभव. | ३३ | रु. ३०,०००/- (रुपये तीस हजार मात्र) |

**अटी व शर्ती**

१. उमेदवाराने ज्या पदासाठी अर्ज केला आहे त्या पदाचा अर्जावर स्पष्ट उल्लेख करावा.
२. अर्जासोबत प्रमाणपत्राच्या साक्षांकित सत्यप्रती जोडण्यात याव्यात. (जन्मतारीख, शिक्षण, अनुभव तसेच अन्य शैक्षणिक प्रमाणपत्र इत्यादी)
३. अर्जामध्ये संपुर्ण नाव, पत्ता (पिन कोडसह), शैक्षिणीक अर्हता, पुर्वानुभव नमुद करावा. तसेच पासपोर्ट आकाराचे छायाचित्र जोडावे.
४. नेमणुकीसंदर्भात निवड समितीने घेतलेले सर्व निर्णय अंतिम राहतील.
५. सदर नेमणूक संपुर्णपणे अस्थायी स्वरुपाची असून कोणत्याही उमेदवारास सदर जाहीर सुचनेच्या अनुषंगाने सेवेत कायम /नियमीत केले जाणार नाही निवड झालेल्या उमेदवारास विहित नमुन्यात प्रतिज्ञापत्र करुन द्यावे लागेल.
६. नियुक्ती देणे / नाकारणे तसेच नमुद कालावधीचे आंत सेवेतुन कमी करणेबाबत अधिकार मा.आयुक्त यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

सही/-
उप-आयुक्त (मुख्यालय)
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

मा.आयुक्त सो. यांचे मान्यतेने